
Dr. Choudhari

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318



# Vidyawarta®

Peer Reviewed International Refereed Research Jou

Issue-29, Vol-07 Jan to March-2019

Editor
Dr.Bapu G.Gholap

02

# Index

01) EFFECT O MARDO INTOXICATION ONBIMODAL OXYGEN UPTAKE IN A FRES ... ||10
ASHISH KUMAR

02) PORTRAYAL OF URBAN LIFE IN NISSIM EZEKIEL'S POETRY ||12
Sunil S. Deshmukh, - Dr. Ms. Kaneez Banoo Quraishi - TUMSAR,

03) Asvini Kumaradvaya or the Asvins: the Physicians in the Vedas : Some observations ||15
Ganesh Tosh– Kharagpur

04) An Analysis of Various Disability Theories ||18
Prof. Akshata Amitkumar Gawade, Kolhapur.

05) An Article on Impacts of Demonetization on Indian Economy ||22
Mr. Ankit Gunvantrai Joshi , Jetpur

06) Cultural Connotations in The Girl In Room 105 by Chetan Bhagat ||27
Shahnaz Khan

07) Social Networking and Addiction ||31
Ms. LATHA . M, UTTAR PRADESH -Dr. SHAHNAWAZ MUSHTAQ

08) MEDIA IN SPORTS ||42
DR. ARPITA MISHRA, AZAMGARH

09) LIBRARY MOVEMENT IN HYDERABAD STATE ||43
R. JAGAN MYTHRI, KASHIBUGGA, WARANGAL

10) Understanding Gandhi's Theory of Trusteeship ||47
Amit Patel, Ahmedabad.

11) Inclusive Education Resource Centres (IERCs) – Strengthening and Promoting of ... ||52
Dr. N. Sita Rama Krishna Rao, Andhra Pradesh

12) Relevance of English Literature in Indian Context ||55
Dr. Sanjay Kumar, Churina (Buhana)

13) EXERCISE OF THE UNION EXECUTIVE DISCRETION TO GRANT PARDON - A CRITIQUE ||58
Mr. Stainslaus.S, M.A, LLM, Nungambakkam, Chennai

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

14) SUSTAINABLE AGRICULTURAL DEVELOPMENT AND ORGANIC FARMING IN ...
**Dr. Rajesh G. Umbarkar, Taroda (kh.), Nanded** ||63

15) A STUDY OF FINANCIAL PERFORMANCE OF SELECTED PUBLIC SECTOR BA ...
**SHRI DEVENDRASINH ZALA** ||68

16) MAKE DEATH LOVE ME as Pyschological Crime Novel
**DR. N. B. MASAL, Gadhinglaj.** ||74

17) महाविद्यालयीन ग्रंथालयची कार्येग्रंथपालाची भूमिका व समस्या
**डॉ. रेवाराम एम मालखेडे, सावरगांव, त. नरखेड, जि. नागपूर** ||78

18) दि.बा.मोकाशी यांची कथा आणि जीवनदृष्टी
**प्रा.डॉ.गणपती जोतीबा मोरे, पाथरी ता.पाथरी जि.परभणी** ||83

19) परभणी जिल्हयांचे संदर्भात महिलांचे स्वावलंबनात स्वयंसहाय्यता बंचत गटाचे योगदान
**पवार सुरेखा विठ्ठलराव डॉ. वसंत के. भोसले.** ||85

20) व्यवसायाची सामाजिक जबाबदारी
**प्रा. नीता संजय पुणतांबेकर, त्र्यंबकेश्वर (नाशिक)** ||88

21) ग्रामीण विकासात ग्रामीण भागातील घटस्फोटित स्त्रियाच्या समस्या व आधार व्यवस्थेचे अध्ययन
**प्रा. श्वेता विनोद वैद्य, अमळनेर** ||91

22) जम्मू–कश्मीर का भारत में विलय : एक नवीन विश्लेषण
**अनुतोष कुमार, बादलपुर, गौतमबुद्ध नगर** ||93

23) भ्रष्टाचार
**डॉ. अंजना ठाकुर, राजनांदगांव (छ.ग) –डॉ.निखत खान, कंटगी बालाघाट** ||99

24) नारी शिक्षा के विकास में आयोग एवं समिति का योगदान
**डॉ. ममता कोशरिया** ||104

25) 'सेज पर संस्कृत' : धार्मिक पाखंड की गाथा
**डॉ. सन्मुख नागनाथ मुच्छटे, उमरगा, तालुका उमरगा जिला उस्मानाबाद** ||107

26) नागरी लिपि: उदभ्व और विकास
**प्रा. इम्रान शेख, नांदेड** ||111

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



२४

27) आत्म—निर्वासन और स्त्री—पुरूष संबंधों की जटिलताएँ
डॉ. हिमानी सिंह, झालावाड़ — वन्दना शर्मा, कोटा ||113

28) निम्न मध्यमवर्गीय परिवारों में गृह — व्यवस्था के संबंध में निर्णय की प्रक्रिया ...
दीपिका कुमारी, कामेश्वर नगर दरभंगा ||117

29) पौराणिक युगीन संगीत व्यवस्था
डा० मोनिका दीक्षित, मथुरा ||122

30) बारां जिले में कस्तूरबा गाँधी बालिका आवासीय विद्यालयों से बालिका शिक्षा पर पड़ने वाले...
डॉ० अन्जूबाला राजपूत, मेरठ ||127

31) मौर्यकालीन शासन—व्यवस्था
डॉ० सरिता कुमारी, नालन्दा ||131

32) मानवतावाद के उपासक : संत कबीरदास
प्रा. डॉ. द्वारका गिते—मुंडे, नांदुर (घाट) तह. केज, जि. बीड ||135

33)हिन्दी चित्रपट में शास्त्रीयता की परम्परा (स्वर सम्राज्ञी लता मंगेशकर के ध्वन्या...
(डॉ.) गुरप्रीत कौर'' — लता, अमृतसर ||138

34) महिला सशक्तिकरण : जागरूकता एवं प्रयास
श्रुति कीर्ति रस्तोगी, जयश्री शुक्ला ||143

35) 'मेक इन इंण्डिया' का आधार कौशल का विकास एवं शैक्षिक मोर्चाबन्दी — एक...
Dr. Sachin kumar, Greater Noida. ||149

36) अन्तर्जातीय विवाह : सामाजिक समरस्ता की ओर एक कदम
डॉ. संजय कुमार, चूरू (राज.) ||154

37) अमानवीयता के दंश का कड़ुआ सच : दलित साहित्य
डॉ० धर्मेन्द्र कुमार, झाँसी (उ०प्र०) ||157

38) शेरशाह की भू—राजस्व व्यवस्था
डा० सेराज मोहम्मद, हल्द्वानी(नैनीताल) ||160

39) ग्राम स्वराज की अवधारणा और उत्तराखण्ड की राजनीति
डॉ भगवती प्रसाद पुरोहित, गोपेश्वर (चमोली) उत्तराखण्ड ||163

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

40) यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्रातील सामाजिक,राजकीय,क्षेत्रातील योगदान एक अभ्यास ||170
**प्रा.कालिदास पंढरीनाथ चौधरी, गेवराई,जि. बीड**


41) विजयदेवनारायण साही और समकालीन आलोचकों की आलोचना दृष्टि ||173
सुनील कुमार गुप्ता, जयपुर

42) न्याय में पद का स्वरूप तथा उसके भेद ||178
मधु बाला

43) उत्तर बंगाल विद्यापीठातील क्षेत्रीय अभ्यास केंद्रामध्ये सादर आचार्य पदवी शोध... ||183
मिलिंद अण्णा मेढे & डॉ. शालिनी एम. साखरकर, सावनेर, जि. नागपूर

44) ROLE OF NON-PEFORMING ASSETS ON THE PROFITABILITY OF DEVELOPMENT... ||187
Dr. RAJEEV SHUKLA & Mr. RAJU KASHYAP, Lucknow

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com






86

India radio, Dehli, October 2,1952

१४ डा० भगवती प्रसाद पुरोहित: पंचायती राज संस्थाओं में नेतृत्व,

१५ रामचन्द्र राही : सम्पूर्ण क्रान्ति यानी गांव गांव में स्वराज, सर्व सेवा संघ, वाराणसी, १९८८ पृष्ठ—८

१६ द्वितीय पंचवर्षीय योजना की रूपरेखा, योजना आयोग भारत सरकार,

१७ आप और सामुदायिक विकास, सामुदायिक विकास और सहकारिता मंत्रालय भारत सरकार, नवम्बर १९५९, पृष्ठ—४ व ५

१८ तीसरी पंचवर्षीय योजना, योजना आयोग भारत सरकार, पृष्ठ—१

१९ गार्ड फाइल जिला मुख्य विकास अधिकारी कार्यालय जनपद चमोली।

२० पूर्वोक्त

२१ पर्वतीय क्षेत्र का विकास प्रगति १९७७—७८ और १९७८—७९ कार्यक्रम पर्वतीय विकास विभाग उत्तर प्रदेश शासन, पृष्ठ—२ व ३

२२ गरीबी हटाओ कार्यक्रम पर राष्ट्रीय विचार गोष्ठी १२ फरवरी १९८८ की रिपोर्ट पृष्ठ— ५, ग्रामीण विकास विभाग भारत सरकार, नई दिल्ली।

२३ प्रधान मंत्री श्री राजीव गांधी द्वारा पंचायती राज संविधान ६४ वां संसोधन, प्रस्तुत करते हुए लोकसभा में १५ मई १९८९ को दिया गया वक्तव्य। लोकसभा कार्यवाही रिपोर्ट संसद भवन नई दिल्ली।

२४ प्रधानमंत्री श्री पी०वी० नरसिंह राव का देश भर की ग्राम पंचायतों के सरपंचों के नाम दिनांक ५ मई १९९३ को लिखा गया पत्र, प्रकाशन विभाग भारत सरकार नई दिल्ली।

२५उत्तराखण्ड विकास : प्रगति १९९४—९५ तथा कार्यक्रम १९९५—९६, उत्तराखण्ड विकास विभाग, उत्तर प्रदेश शासन।

२६ Draft Eight five year plan 1992-97, Uttaranchal sub-plan, Vol. IV, page- 19

२७ Ninth five year plan 1997-2002, Uttaranchal sub-plan, Vol. I, page- 19

❑❑❑

40

# यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्रातील सामाजिक, राजकीय, क्षेत्रातील योगदान एक अभ्यास

**प्रा. कालिदास पंढरीनाथ चौधरी**
राज्यशास्त्र विभाग,
महिला महाविद्यालय गेवराई, जि. बीड

**प्रस्तावना :**

महाराष्ट्रामध्ये नव्हे तर देशाच्या राजकारणामध्ये स्वत:चे आयूष्य व्यतीत करणारे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आदरनीय यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्र व देशाच्या संदर्भातील कार्य आणि कर्तृत्व खरोखरच उत्तुंग व उच्चप्रतीचे आहे.त्यांनी आपले संपुर्ण आयुष्य देशसेवेसाठी खर्च केले. त्यांनी भारतीय राजकारणामध्ये गांधी आणि नेहरुच्या नेतृत्वाखाली म्हणजेच कॉंग्रेस मध्ये राहून स्वत:ला स्वांतत्र्य आदोंलनात झोकून दिले. त्यांची महात्मा गांधी यांच्यावरील निष्टा व नेहरुच्या लोकशाही समाजवादाने ते पुर्ण कॉंग्रेसवादी झाले. त्यांनी जीवनांच्या अखेरपर्यंत कॉंग्रेसमध्ये राहून राजकारण व समाजकारण करीत राहीले.

महाराष्ट्रातील तत्कालीन राजकीय, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक परिस्थितीचे संपुर्ण आकलन त्यांना झालेले होते. यशवतंराव चव्हान यांच्या जडघडनीमध्ये महात्मा फुले, वि.रा.शिंदे, आणि शाहुमहाराज यांच्या कार्य कर्तृत्त्वाची फार खोलवर प्रभाव पडलेला असल्यामूळे शिक्षण हे समाज परिवर्तनाचे व आर्थिक विकासाचे प्रमूख साधन आहे यावर त्यांची प्रगाढ श्रध्दा होती. फूले शाहू ही आपली दैवते आहेत असे ते म्हणत होते. त्यांनी महाराष्ट्राचे राजकारण, समाजकारण, अर्थकारण व शिक्षणाच्या क्षेत्रात कार्य करून नवे मापदंड निर्माण केले होते. म्हणूनच महाराष्ट्राचे नाव निघताच यशवतंरावाचा उल्लेख अपरिहार्य ठरतो. एवढे ते आधूनिक महाराष्ट्राशी जोडलेले आहेत. चव्हाणांचे राजकीय कार्यक्षेत्र पुण्यापासून कोल्हापूर पर्यंतचा प्रदेश व विशेषत: साताग जिल्हा होय. हे महाराष्ट्रातील वर्तमान युगातील फार मोठ्या सामाजिक आंतविगृहाचे केंद्रस्थान होय. १९१० ते १९५० पर्यंतच्या कालखंडात याच प्रदेशात सत्यशोधक समाजाची किंवा ब्राम्हणेत्तरवादाची चळवळ नावारुपास येवून फोफावली. मात्र या चळवळीत स्वत: यशवंतराव प्रत्यक्षपणे कधीच शिरले नाहीत. किंवा त्या चळवळीतील विकृत आत्मिद्वेशाचाही संस्कार त्यांनी आपल्या मनावर होऊ दिला नाही. त्या चळवळीपासून वा त्यांच्या दोषापासून ते अलिप्त राहिले. पंरतू त्या चळवळीत निर्माण झालेल्या सामाजिक जाणिवेचा त्यांनी कधी विसर पडू दिला नाही.

भारताला स्वांतत्र्य मिळाल्यानंतर संयुक्त महाराष्ट्र निर्मीतीची



87

चळवळ सूरु झाली व द्विभाषिक महाराष्ट्र राज्याचे १ नोव्हेंबर १९५६ रोजी यशवंतराव चव्हाण यांनी मुख्यमंत्री पदाची सुत्रे स्विकारली तत्पुर्वी त्रिराज्य योजना, केंद्राशासित मुंबई विशाल द्विभाषिक असे विवीध पर्याय पुढे आले. त्यामुळे यशवंतराव चव्हाण यांनी लोकशाहिच्याच बाजुने आपले मत मांडुन त्यांनी संयूक्त महाराष्ट्रालाच पाठिंबा दिला. त्यापुर्वी त्यांनी एकभाषी राज्याविषयी आपले मत त्यांनी स्वच्छ भाषेत मांडले.आणि नंतरच द्विभाषिक राज्यनिर्माणासाठी संमती दिली.

तर्कतिर्थ लक्ष्मन शास्त्री जोशी आपल्या आठवनीवुन सांगतात की, कॉंग्रेस संघटनेला व राष्ट्राने त्यांना महाराष्ट्रातील आघाडी सांभाळनारा नवा माणूस श्री चव्हांनाच्या स्वरूपाने सापडला. त्यामूळे द्विभाषिक मुंबई राज्याचे नेतृत्व श्री चव्हानांना प्राप्त झाले. यशवंतराव चव्हान यांच्या बदल महाराष्ट्रात खुपच विवीध प्रकारचे गैरसमज होते. त्यामुळेच द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्रीपद प्राप्त झाल्यानंतर अनेक आश्चर्याचे धक्के देत यशवंतराव चव्हाण यांचे कर्तृत्त्व विकसित होऊ लागले. विशेष म्हणजे मुंबईच्या प्रतिष्ठितांना नवाच शोध लागला. बहुजन समाजात मूंबईच्या विश्वजनीन बहूरंगी व प्रगत संस्कृतीचा राज्यकारभार पेलनारा मानूस असेल यांची शक्यताच वाटत नव्हती. मुंबई हीच संयुक्त महाराष्ट्राचा उपाय होता. असे महाराष्ट्रातील जनतेला चव्हाण साहेब सभेतून सांगत होते.

१ मे १९६० रोजी सकाळी पंतप्रधान पंडीत नेहरु यांच्या हस्ते संयूक्त महाराष्ट्र या नविन राज्याचे उद्घाटन झाले. आणि संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मूख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांना नेमण्यात आले. त्यांनी स्वंतत्र्य राज्य निर्मीतीच्या वेळेस महाराष्ट्राच्या बाबतीमध्ये केलेल्या भाषणामध्ये ते म्हणतात की, गेल्या काही वर्षात महाराष्ट्रातील जनतेची जी विचलीत अशी व्यवस्था झाली होती ती आता संपून महाराष्ट्राला यापुढे स्थेर्याचे दिवस येतील. अशी आशा करण्यास मुळीच हरकत नाही.त्याऐवजी लोकांना आता आपल्या विकासाच्या प्रश्नाकडे कटाक्षांने लक्ष देता येईल व विकास कामाच्य बाबतीत येणाऱ्या निरनिराळ्या अडचनीनां ते अधिक परिणामकारकपने तोंड देवू शकतील नव्या महाराष्ट्र राज्याच्या जन्माने आपल्याला भरभराटीचे व सुखाचे दिवस येतील. ही सामान्य जनतेची अपेक्षा योग्य अशीच आहे. जनतेच्या अपेक्षा पूर्तीचा क्षण जवळ आणने हा महाराष्ट्र राज्याचा मी मानबिंदु मानतो असे त्यांनी आपले मत व्यक्त केले होते. त्यांना द्विभाषीक राज्य मंजूर नव्हले तर त्यांना स्वंतत्र महाराष्ट्र हवा होता. असे त्यांच्या भाषणावरुन सिध्द होते. महाराष्ट्र राज्यामध्ये एकोपा निर्माण करण्यासाठी सामाजिक आणि आर्थिक समस्या सोडविल्या पाहिजेत. सामाजिक क्षेत्रातील ब्राम्हण - ब्राम्होणत्तर वाद आणि अश्पृश्याचा प्रश्न यामुळे प्रमुख समस्या निर्माण झाली आहे. राजकीय क्षेत्रामध्ये महाराष्ट्राच्या तिन्ही विभागाचे विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र यांचे एकात्म साधने ही मुख्य समस्या आहे. या सर्व समस्यांच्या मुळाशी लोकशाहीबद्दल निष्टा वाढवून लोकशाही व्यवहाराला चालना द्यावयाची ही मुलभूत भूमिका त्यांनी घेतली होती.

**सामाजिक कार्य :**

भारतीय समाजव्यवस्थेतील जातीव्यवस्था, स्पृश्य-अस्पृश्यता, श्रेष्ठ-कनिष्ठत्व अशा विविध दोषांमध्ये महाराष्ट्र अडकला होता. हिंदू समाजातील अस्पृश्यतेचा कलंक मिटविण्याचा विचार यशवंतरावांनी केला. याबाबत फुले, आंबेडकर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारसरणीचा त्यांच्या मनावर विशेष पगडा होता. समाजाच्या विकासाला जाती व्यवस्था अस्पृश्यता इत्यादी बाबी आड येत होत्या. भारताला सामर्थ्यशाली बलवान राष्ट्र बनवायचे असेल तर ह्या वरील बाबीचा नायनाट होणे आवश्यक आहे. असे त्यांनी आपले विचार मांडले.

यशवंतराव चव्हाण यांनी धर्म आणि जाती यात दुभंगलेल्या समाजामध्ये सामाजिक एकता प्रस्थापित करण्याचे कार्य त्यांनी केले आहे. महाराष्ट्रातील अस्पृश्य वर्गाला इतर समाजाच्या व्यवस्थेत बळकट करण्यासाठी त्यांनी महत्त्वाचे कार्य केले आहे. महाराष्ट्रातील समाज जातीनिरपेक्ष राहावा व येथील अस्पृश्य समाज मानाने स्वाभिमानाने कसा राहिल यासाठी त्यांनी सदैव प्रयत्न केले. एवढेच नव्हे तर महाराष्ट्र स्थापनेच्या दिवशी म्हणजेच १ मे १९६० रोजी यशवंतरावांनी ब्राह्मण समाजातील जकर्त प्रकरनासंबंधीची कर्ज माफ करण्याची घोषणा केली. यावरून असे सिद्ध होते की, सामाजिक एकता निर्माण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न त्यांच्या अंगी आहे हे दिसून येते. यावरून त्यांचे समाज परीवर्तनाचे कार्य हे डोळस वृत्तीचे होते. समाजामध्ये मानसाच्या अंगी सामाजिकता टिकविण्यासाठी समाज प्रबोधनाची गरज असते याची जाणिव त्यांना होती. म्हणूनच त्यांनी साहित्य निर्मीतीकडे लक्ष घालून साहित्य आणि संस्कृती या मंडळाची स्थापना केली.

यशवंतराव चव्हाण यांना सर्व जाती धर्माबद्दलच्या लोकांविषयी आदराची भावना होती. त्या काळात विठ्ठल रामजी शिंदे हे सामाजिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य करीत होते. यशवंतरावांना त्यांना भेटण्याची इच्छा झाली. व ते पुणे येथे भेटीकरीता आले. त्यांच्या मध्ये अनेक प्रश्नाविषयी चर्चा झाली व यशवंतरावांनी त्यांना कराडला येण्याचे आमंत्रित केले. तेव्हा माझी अट आहे की, माझ्या सोबत हरिजनानाही घरी बोलवावे लागेल यावर यशवंतराव लगेचंच हो म्हणाले यावर वि.रा. शिंदे म्हणाले की, तुमच्या घरच्यांना विचारले का? तेव्हा यशवंतराव म्हणाले की, माझ्या बरोबर अनेक हरिजन मित्र माझ्या घरात येतात व माझ्या आईचा याला कधीही विरोध नसतो. हे ऐकून वि.रा.शिंदे खूष झाले. यावरून असे सांगला येईल की, यशवंतरावाच्या घरचे वातावरण हे सर्वधर्म समभावाचे असल्याचे दिसून येते. ते नेहमी म्हणत असत की, नवसमाज निर्मीतीत जातीवाद हा शाप आहे. खेड्यातील जातीवर आधारलेली समाजरचना नष्ट करून समता, बंधुता, स्वातंत्र्य, न्याय अशा मुद्यावर आधारीत नवे ग्रामीण जीवन महाराष्ट्रात रूजविण्याचे विचार यशवंतराव मनाशी बाळगून होते. जातीय बांधवांच्या चक्रव्युहात सापडलेला मानव मुक्त करून नवा माणूस निर्माण करावा, समाज आपले प्रश्न एकमेकांच्या जिव्हाळ्याने समजुतीने सोडविण्यासाठी एकत्र बसवून निर्णय करू शकतो असे पंचायतीचे जीवन जगणारे खेडे त्यांना अभिप्रेत असल्याने पददलितांच्या संबंधात ज्या काही समस्या त्यांच्या समोर आहे या समस्या विषयी त्यांनी मोठ्या तळमळीने निर्णय घेतले. त्यांनी अस्पृश्य वर्गाला राष्ट्रीय जीवनाच्या प्रवाहात आनण्यासाठी महत्त्वाचे कार्य केल्याचे दिसून येते.

यशवंतराव चव्हाण समाजपरिवर्तनाच्या बाबतीत खूपच जागरूक होते. संपूर्ण भारताच्या समाज व्यवस्थेचे चित्र त्यांच्या डोळ्यासमोर होते. म्हणून त्यांनी अस्पृश्य समाज व्यवस्थेचे चित्र बदलण्यासाठी प्रयत्न केले. त्याचबरोबर त्यांनी शैक्षणिक, कृषिविषयक, उद्योगासंबंधी कार्य मोठ्या प्रमाणात केले आहेत. प्रथम त्यांनी कमाल शेतजमीन धारणा कायदा निर्माण केला. या कायद्यानूसार उपलब्ध झालेल्या जमिनीवर पिके घेण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषीमंडळ स्थापन केले जमीन कसणाऱ्या शेती करणारा मालक करणारा कुळाचा कायदाही निर्माण केला. यामुळे पिढ्यानपिढ्या शेतमजूर म्हणून राबणारे शेतमजूर हे स्वतः शेतकरी झाले. यामुळे ग्रामीण भागात क्रांतिकारी बदल झाला. या विषयी यशवंतराव चव्हाण असे म्हणतात की, शेतकरी हा महाराष्ट्राचा प्राण आहे त्याचबरोबर हा केवळ शेतीवर राहू शकत नाही. म्हणून शेतीला पुरक व्यवसाय निर्माण करण्यावर त्यांनी भर दिला. शेतकऱ्यांना सावकारी जाचापासून मुक्ती मिळावी व त्यांना गरजेच्या वेळी अर्थसाहाय मिळावे या हेतूने महाराष्ट्रात सहकार चळवळ मजबूत करण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर त्यांनी महाराष्ट्राचा विकास करायचा असेल तर औद्योगिकीकरणाने खूप मोठी झेप घेतली व साखर कारखाने, सुतगिरण्या, ऑईल मिल, दुध प्रकल्प हे सहकारी क्षेत्रातून ऊभे केले. त्याचप्रमाणे सहकारी क्षेत्रामध्ये जिल्हा बँका, क्रेडीट सोसायट्या दुग्ध व्यवसाय अस्तित्त्वात आले. तसेच त्यांना कोयना प्रकल्प आणला, त्यामुळे शेतीमध्ये सुध्दा क्रांति झाली. महाराष्ट्रात शेतीसाठी लागणाऱ्या सोयी सुविधा जसे ट्रॅक्टर, इलेक्ट्रीक मोटार, क्रशर, हार्वेस्टर अशी यंत्र सामग्री वाढविण्यावर त्यांनी जोर दिला. तसेच त्यांच्या काळामध्ये विदर्भातील पारस थर्मला पॉवर स्टेशन हा भव्य दिव्य प्रकल्प उभारला अशाप्रकारे महाराष्ट्राचा सर्वांगीन विकास डोळ्यासमोर ठेवून सामाजिक पातळीवर सर्व समाज घटकांना सारख्या दृष्टीकोनातून पाहणारा एक दृष्टी नेता महाराष्ट्राला यशवंतरावाच्या रूपाने मिळाला असे म्हणावे लागेल.

**राजकीय कार्य :**

यशवंतराव चव्हाण हे केवळ राजकीय पक्षाचे मुख्यमंत्री म्हणून राज्य चालवित नव्हते तर लोकशाहीचा नेता, हे त्यांचे मुख्य वैशिष्ट्ये आहे, लोकशाहीचा नेता असलेल्या राज्यकर्त्याने लोकांच्या चळवळीवर शस्त्र शक्यतो पर्यंत वापरूच नये असे त्यांना वाटत होते. अहमदाबाद येथील प्रशासक आंदोलन सार्वत्रिक अखिल भारतीय संप व महाविदर्भवादी चळवळ यातील त्यांचे वर्तन अहिंसावादीच असल्याचे दिसून येते. बलवानाची अहिंसा हिच खरी अहिंसा या गांधीच्या सिद्धांताचे आचरण करून त्यांनी राजकीय कार्य करण्याचे प्रयत्न केले आहेत. स्वातंत्र्यपूर्व अहिंसक आंदोलन हे निर्वळ म्हणजे निशस्त्र जनतेचे आंदोलन होते. काँग्रेसच्या हाती सत्ता-बल-शस्त्र आल्यानंतर बलवानाची अहिंसा या सिद्धांताचा प्रयोग करण्याची संधी प्राप्त झाली आहे. २० व्या शतकाच्या मध्यान्हामध्ये डावे व ऊजवे भेद सुध्दा मोठ्या प्रमाणात आहेत. भारतातही तसे दिसून येतात. या सर्व बाबी लक्षात घेऊनच यशवंतराव चव्हाण राज्यकारभारात विरोधी पक्षानाही विश्वासात होत होते. हे एक व्यापक लोकशाही नेतृत्त्वाचे लक्षण आहे.

यशवंतराव चव्हाण हे नविन द्विभाषीक राज्याचे मुख्यमंत्री झाले. त्यांच्या जन्मापासून वयाचा विचार न करता त्यांच्या राजकीय वयाचा म्हणजे प्रत्यक्ष राजकारणात त्यांनी कीती वर्ष जबाबदारी घेऊन कामे केली याचा विचार करणे गरजेचे आहे, तसे पाहिले तर वयाच्या सोळाव्या वर्षीच ते भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात सामील झाले. गेली कित्येक वर्षी त्यांनी राजकारण केले आहे. त्यांच्या २६ वर्षाच्या काळामध्ये त्यांनी राजकारणात भाग घेतला. ते राजकारणातून समाज विकास करीत राहिले. सन १९४५ नंतर यशवंतराव महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्याच्या टीममध्ये दिसावयास लागले. थोड्याच अवधीत काँग्रेसच्या हाती ब्रिटीशांनी भारताची सत्ता सोपविली. या दहा वर्षात काँग्रेसच्या हाती सत्ता असल्यामुळे यशवंतरावांना शासन तंत्राचा अनुभव आला. सत्तेचे राजकारण कसे चालते व ते कसे चालवावे याचे प्रत्यक्ष अनुभव कसलेल्या प्रसासक मित्राच्या सानिध्यात राहून त्यांनी जवळून पाहिले व त्यात त्यांनी भागही घेतला होता.

यशवंतराव चव्हाण मुंबई राज्याच्या मंत्रीमंडळात ते प्रत्यक्ष राज्यकारभार करीत होते. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी महत्त्वाचा घेतलेला निर्णय म्हणजे मुंबई राज्याच्या मंत्रिमंडळात गेल्या पाच वर्षातील अनेक प्रसंग यशवंतराव चवहाण यांनी झेलले. अशा त्यांच्या राजकारणी पैलुचा इतिहास पाहावयास मिळतो. त्याचबरोबर त्यांनी महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री होण्याचा मान मिळविला व त्याकाळात त्यांनी केलेले राजकीय कार्य महत्त्वाचे आहे. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य निर्मीतीची संधी साधून त्यांनी महात्मा गांधीच्या हत्यनंतर महाराष्ट्रात जाळ पोळ झालेल्या पूणर्वसनासाठी कर्ज देण्याची घोषणा केली. त्यांनी घेतलेल्या निर्णयाचे महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणात स्वागत करण्यात आले.

यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या मुख्यमंत्री काळामध्ये महाराष्ट्र राज्यामध्ये गुढीपाडव्यास सार्वजनिक सुटी देण्याचा महात्वाचा निर्णय घेतला. तसेच मंत्र्याच्या बंगल्यांना वैयक्तिक नावे देण्याची पध्दत होती ती बदलून त्यांनी सह्याद्री, मेघदुत, रामटेक अशी नावे त्यांनी दिली. या त्यांच्या राजकीय कार्यावरून महाराष्ट्राला वेगळे वळन लावण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. राजकीय कार्य करीत असतांना त्यांनी स्वत:ची भूमिका व्यापक ठेवली. त्यांच्या काळामध्ये सत्तेचे विकेंद्रीकरणाचा कायदा करण्यात आला. बलवंतराव मेहता समितीने सूचविलेल्या विकेंद्रीकरणाच्या सूचनांचा विचार करण्यासाठी त्यांनी वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षेतेखाली दि. ७ एप्रिल १९६१ रोजी समिती नेमली. या समितीच्या अहवालानूसार यशवतरावांनी सत्तेच्या लोकशाही विकेंद्रीकरणाचे तत्त्वमान्य असल्याचे जाहिर केले. सत्तेच्या विकेंद्रीकरण करणाऱ्या जिल्हापरीषद व पंचायत राज्यांची योजना प्रत्यक्षात १ मे १९६२ रोजी अंमलात आणली. त्यांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी त्यांनी मोलाचे कार्य केले आहे. त्यांनी विदर्भासंबंधी तसेच निवडणूका विषयी आपली प्रांजळ भूमिका मांडली आहे. ते म्हणतात की, असा ठराव सभागृहासमोर मांडल्यामुळे ज्या पक्षाचे सरकार वर्तमान काळात सत्तरूढ झालेले आहे. त्या पक्षाने सार्वत्रिक निवडणूकीत कोणती बंधने अवलंबली आहेत असे सांगण्याची संधी मला मिळाली आहे. विरोधी पक्षाच्या नेत्यांनी सार्वत्रिक निवडणूकीच्या पूर्वी काही काळ कोणताही पक्ष सत्तेवर असता कामा नये अशी सूचना



८९

केली. परंतू अशा परिस्थितीत जर कोणत्याही पक्षाचे सरकार सत्तेवर राहिले नाही तर एक प्रकारची पोकळी निर्माण होईल यावरून असे सांगता येईल की, सत्ताधारी पक्षाणे नियमाचे कठोर पालन केले पाहिजे असे यशवंतरावांना वाटत होते.

यशवंतराव चव्हाण यांनी राजकारण विविध विचारांच्या माध्यमातून आणि नेत्यांच्या सहकार्यातून मैत्रीतून विचारमंथनातून राजकीय प्रवास त्यांना फारच उपयुक्त ठरला. ते कार्यकर्त्यांच्या सहमतीवरूनच कोणताही महत्त्वाचा निर्णय घेत होते. त्यामुळेच त्यांनी मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते व मित्र जोडले होते. त्यानी प्रशासकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रात राज्याचा विकास करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी यासाठी उचललेली पाऊले आजच्या काळात राज्याला यशोशिखरावर नेणारी ठरली आहेत, जात, धर्म पंथ या भिंती न ठेवता केवळ विकासाची दृष्टी बाळगून कायम समाजहिताचा विचार करणाऱ्या या महान नेत्यांचा आदर्श आजच्या काळात प्रत्येकाने घ्यायला हवा.

**समारोप :**

भारताच्या नकाशावर आज ताठ मानेने महाराष्ट्र ऊभा आहे तो केवळ यशवंतराव चव्हाण यांच्याच प्रयत्नामुळे असे म्हणायला हरकत नाही. त्यांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रामध्ये केवळ स्वार्थासाठी राजकारण न करता समाजहितासाठी राजकारण केले होते. यशवंतराव केवळ पुढारी मंत्री नव्हते तर ती एक थोर व्यक्ती आहे. भोगापेक्षा त्याग मोठा आहे. यातून त्यांच्या कार्याची वास्तवतेची ज्ञान होते, अशा या महान नेत्यांच्या राजकीय व सामाजिक कार्याचा वेध घेणे महत्त्वाचे आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. यशवंतराव चव्हाण, कृष्णकांठ यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र, रोहण प्रकाशन, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, ७ फेब्रुवारी १९८४.

२. श्री यशवंतराव चव्हाण, अभिनंदन ग्रंथ तर्कतिर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी, श्री यशवंतराव चव्हाण जन्म दिन सत्कार समिती, नागपूर, १२ मार्च १९६१.

३. यशवंतराव चव्हाण भूमिका, रोहण प्रकाशन शनिवार पेठ पुणे, १५ डिसें. १९७९.

४. जोशी रामभाऊ, यशवंतराव एक इतिहास, प्रतिमा प्रकाशन, परभणी, २५ नोव्हे.२०१८.

५. यशवंतराव चव्हाण, सह्यांद्रीचे वारे, रोहण प्रकाशन, यशवंतराव चव्हाण, प्रशिक्षण मुंबई, २६ जून २०१४.

६. प्रा.डॉ. विजय पाथ्रीकर, थोरले साहेब, कैलास पब्लिकेशन औरंगपूरा औरंगाबाद, डिसें २०१८.

७. डॉ. भगवान अंजनीकर, निवडक महापुरूष, निर्मला प्रकाशन नांदेड, १४ जाने. २०१४.

८. लोकसत्ता दिवाळी अंक, २०१०.

९. चौगुले श्रीकांत, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण अविष्कार प्रकाशन, पुणे मार्च २००८

१०. प्रमोद त्र्यं. नलावडे, लोकराज्य अंक १२ मार्च २०१२.

**41**

# विजयदेवनारायण साही और समकालीन आलोचकों की आलोचना दृष्टि

सुनील कुमार गुप्ता
हिंदी विभाग,
राज. वि.वि. जयपुर

**१. मार्क्सवादी आलोचक शिवदान सिंह चौहानः—**
यह हिन्दी के प्रगतिशील खेमे के आलोचक है। इन्होनें हिन्दी साहित्य में अपने सिद्धान्तों के बलबूते अनेक मानदण्ड निर्धारित किए। इन्होने न सिर्फ मार्क्सवादी दृष्टिकोण को स्पष्ट स्वीकार किया, बल्कि उसका व्यावहारिक रूप भी अपनी आलोचना में प्रस्तुत किया। इनका १९३७ ई. के विशाल भारत में भारत में प्रगतिशील साहित्य की आवश्यकता लेख हिन्दी जगत में अत्यन्त प्रसिद्ध हुआ। इन्होनें अपने सम्पूर्ण आलोचना कर्म में प्रगतिशील साहित्य के सिद्धान्तों को एक जगह करने का प्रशंसित कार्य किया। इन्होनें भक्तिकाल व रीतिकाल में अन्तर बताते हुए यह निष्कर्ष निकाला कि जहां भक्तिकाल में कविता में आत्म समर्पण व तल्लीनता का भाव था, उसी के विपरीत रीतिकाल में कविता को कोकशास्त्र ही लिखा गया। (१) इससे उन्होने साहित्य के मानदण्डों को लाभ न पहुंचाकर हानि ही पहुंचाई। प्रगतिवादी विचारधारा का मानना है कि समाज और व्यक्ति दोनो को जनवादी दृष्टिकोण से ही वैज्ञानिक तथा विश्वजनीय धरातल पर पहुंचाया जा सकता है। डॉ. चौहान की दृष्टि बराबर इसी बात पर केन्द्रित रही कि व्यक्ति व समाज दोनो की भावी प्रगति के योग क्षेम की दृष्टि से कला व साहित्य का नव निर्माण प्रयोजनीय है। (२) डॉ. चौहान मानव मूल्यों की तलाश करने वाले अभिकर्ता